॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. १४ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंब्रिज प्लेसमेंट ट्रेनिंग अँड काउन्सेलिंग (CTPC) सभागृहात केबीसीएनएमयू सेंटर फॉर इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेस (KCIIL) विभागातर्फे दि. २०, २१ व २२ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत तीन दिवसीय 'स्टार्टअप बूटकॅम्प' (निवासी कार्यशाळा) आयोजित करण्यात येत आहे. स्टार्टअप संस्कृतीला चालना देत विद्यार्थ्यांना उद्योजकतेकडे प्रवृत्त करण्याच्या हेतूने हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे.

या बूटकॅम्पचे उद्घाटन दिनांक २० नोव्हेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता कुलगुरू प्रा. विजय एल. माहेश्वरी यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाला विद्यापीठातील प्रमुख अधिकाऱ्यांसह उद्योगविश्वातील तज्ज्ञ मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

तीन दिवस चालणाऱ्या या बूटकॅम्पमध्ये सहभागी विद्यार्थ्यांसाठी स्टार्टअपची संकल्पना, कल्पना विकसित करणे, बिझनेस मॉडेल कॅनव्हास, फंडिंग, मेंटरशिप, मार्केटिंग स्ट्रॅटेजीज, तसेच प्रेझेंटेशन स्किल्स यांसारख्या महत्त्वाच्या सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्यक्ष उद्योग क्षेत्रातील तज्ञ व्याख्याते, अनुभवी उद्योजक व इनोव्हेशन मेंटर्स विद्यार्थी सहभागींचे मार्गदर्शन करणार आहेत. विद्यार्थ्यांनी या संधीचा पुरेपूर लाभ घ्यावा, असे आवाहन KCIIL विभागातर्फे करण्यात आले आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १४ नोव्हेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता